ISSN: 2319-7943 IMPACT FACTOR : 5.4906 (UIF) VOLUME - 5 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2017

TACTFUL MANAGEMENT RESEARCH JOURNAL

भारतातील पैशाचे विमुद्रीकरण : कारणे आणि परिणाम

प्रा. डॉ. सुरेश दगडू पाटील
ज.जी.म.वि.प्र. समाजाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय , जळगांव.

अ) प्रस्तावना

भारतात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर बरेच बदल झालेले दिसून येतात. परंतु त्यात सातत्याचा अभाव दिसून येतो. म्हणून भारतीय अर्थव्यवस्था आज विकसनशील अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. भारताच्या आर्थिक विकासाला खऱ्या अर्थाने चालना मिळाली ती १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणाने. कारण याच काळात भारताने मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला व परकीय गुंतवणूकदारांना एक प्रकारे आमंत्रणच दिले. यानंतर अनेक उद्योगांनी भारतात प्रवेश केला. शासनाने देखील अनेक उद्योगांचे खाजगीकरण करुन ते देशातील व्यक्तींना सुरु करण्यासाठी दिले. एकप्रकारे देशात रोजगाराची लाटच निर्माण झाली असतानाही देशाचा पाहिजे त्या पध्दतीने विकास झाला नाही. कारण अनेक उद्योजकांनी देशाच्या आर्थिक विकासात महत्वाची भूमिका बजावणारा जो घटक असतो तो म्हणजे पैसा उद्योजकांनी कर देण्याचे टाळले व तो पैसा काळ्या पैशाच्या नावाने साठविला जाऊ लागला.

भारताच्या इतिहासात वर्तमान काळात अनेक क्रांतिकारी बदल पहायला मिळतात. तसेच भविष्यातही असे बदलांचे वर्तमान सातत्य चालू राहील. त्याच पध्दतीने देशांच्या शासनव्यवस्थेत नित्य प्रमाणात विस्तृत असा बदल घडून येतो तेव्हा सगळ्या प्रयत्नांची स्तुती करण्याऐवजी भारतीय नागरिकांना या बदलांचे आश्चर्य वाटते किंवा धक्का बसतो. असाच बदल विमुद्रीकरण संदर्भात झालेला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत असलेला काळा पैसा हा एक प्रकारचा भयंकर आजार आहे. हा काळा पैसा समूळ नष्ट करण्यासाठी ८ नोव्हेंबर २०१६ हा बँकिंग प्रणालीच्या इतिहासातील एक सोनेरी दिवस ठरला. या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऐतिहासिक निर्णय घेतला. जो सामान्य भारतीय लोकांना स्वप्नवत वाटणारा परंतु प्रत्यक्षात आलेला घणाघाती निर्णय होता. ८ नोव्हेंबरला रात्री १२ वाजेपासून ५०० व १०० रुपयांच्या नोटा रद्द केल्यात. देशातील भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी आणि परदेशातील काळा पैसा बाहेर काढण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ही घोषणा राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात केली. या ५०० व १००० रुपयांच्या कायदेशीर रद्द झालेल्या नोटा पुढील ५० दिवस म्हणजेच १० नोव्हेंबर ते ३० डिसेंबर २०१६ पर्यंत देशातील सर्व बँका व पोस्ट कार्यालयांमध्ये जमा करता येईल असे जाहीर केले.

विमुद्रीकरण भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम २४ (२) नुसार रिझर्व्ह बँकेच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सनुसार केंद्र सरकार कोणत्याही मूल्यांच्या नोटावर बंदी घालू शकते. या नोटबंदीचा मुख्य उद्देश काळा पैसा रोखणे, भ्रष्टाचारास आळा घालणे, दहशतवाद व नक्षलवाद यांना होणारा टेरर फंडींग थांबविणे, बनावट नोटा यांना आळा घालणे हा असतो. विमुद्रीकरण ही एक प्रक्रिया आहे. विमुद्रीकरण ही प्रक्रिया पैशाच्या मूल्याशी संबंधित आहे. ही प्रक्रिया देशाच्या व जगाच्या पैशाच्या मूल्यांशीच संबंधीत आहे. जुने चलन बदलून नवीन चलन व्यवहारात आणणे. भारताच्या राष्ट्रीय चलनात हा बदल होणे आजच्या काळाची गरज आहे. याचा मुख्य उद्देश गैरमार्गाने समाजात जो पैसा वापरला जातो त्यापासून परावृत्त करणे, हे आहे. विमुद्रीकरणाचा अर्थ संपूर्ण चलनातील नोटा रद्द न करता चलनातील काही नोटा रद्द करणे असा आहे. अर्थात नोटबंदीमध्ये मोठ्या चलनातील नोटा रद्द केल्या जातात. याचे कारण असे की, काळा पैसा किंवा साठविलेला पैसा मोठ्या रकमेच्या नोटांमध्ये असतो. जगातल्या बऱ्याच देशांनी त्यांच्या चलनाचे विमुद्रिकरण केले आहे. भारताने हा प्रयोग तिसऱ्यांदा केला आहे. १९४६ मध्ये १००० आणि १०,००० रुपयांचे चलन अर्थव्यवस्थेतून रद्द करण्यात आले होते. ३८ वर्षापूर्वी म्हणजे १९७८ मध्ये भारताचे त्यावेळचे पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी भ्रष्टाचार, काळा पैशाविरुध्द मोहीम राबविली. १६ जानेवारी १९७८ मध्ये भारतीय चलनाचे विमुद्रीकरण करण्यात आले. त्यावेळेस १००, ५००० तसेच १०,००० च्या नोटा रद्द करण्यात आल्यात. जसे आज आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या निर्णयाने सर्व नागरिकांना धक्का बसला व आश्चर्य वाटले. तसेच त्यावेळी लोकांना वाटले होते मोठ्या स्वरुपाच्या नोटा निरुपयोगी झाल्या, गैरमार्गासाठी त्याचा वापर थांबू लागला. थोडक्यात विमुद्रीकरणामुळे समाजात गैरमार्गाला आळा बसला.

भारतात विमुद्रीकरण करण्यात आले. भारतात सध्या चलनात असलेल्या ५०० व १००० रु. च्या नोटांची संख्या मोठी होती. त्याचे एकूण चलनाशी असलेले प्रमाण ५०० रु. च्या नोटांचे ४७.८० टक्के व १००० रु. नोटांचे ३८.६० टक्के म्हणजेच एकूण ८६.४० टक्के इतके होते. एवढ्या मोठ्या प्रमाणात नोटा चलनाबाहेर काढल्यानंतर त्याचा रोखतेवर होणारा परिणाम साहजिकच गंभीर असणार. नोटाबंदी करताना मोठ्या चलनातील नोटा रद्द करणे हे धोरण अवलंबीले जाते. हे सर्वसामान्य लोकांना गोंधळात टाकण्यासारखे आहे.

राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत काळ्या पैशाला आळा घालावयाचा असेल तर दर दहा वर्षांनी चलनी नोटा बदलल्या पाहिजेत, असा विचार अनेक दशकांपूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'दि प्रोब्लेम ऑफ रुपी' (The Problem of Rupee) या ग्रंथामध्ये मांडला होता. ज्याला अर्थशास्त्रीय भाषेत नोटांचे विमुद्रीकरण किंवा

निश्चलीकरण असे म्हटले जाते. कारण पैसा हे माध्यम असते वस्तू नाही. पैसा हा देशाच्या अर्थव्यवस्थेत नेहमी फिरत राहायला पहिजे. ज्यांच्याकडे काळा पैसा आहे ते लोक जास्त दर्शनी मूल्याच्या नोटा जमा करुन साठवून ठेवतात.

संशोधन पध्दती

सदर संशोधनासाठी निवडलेली समस्या वर्तमानकालीन असल्यामुळे संशोधनासाठी सर्वेक्षण व विश्लेषणात्मक पध्दतीची निवड केलेली आहे. माहिती मिळविण्यासाठी दुय्यम साधनांच्या वापरावर भर दिलेला आहे. वर्तमानपत्रे, मासिके व संदर्भग्रंथांचा वापर केलेला असून इंटरनेटच्या माध्यमातून माहिती मिळविण्याचा देखील प्रयत्न केलेला आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये

१. विमुद्रीकरणाचा आढावा घेणे.
२. विमुद्रीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवर अल्पकालीन व दिर्घकालीन परिणामांची चर्चा करणे.

ब) भारतातील पैशाच्या विमुद्रीकरणाची कारणे
(Causes of Demonetization of Money in India)

१) **काळ्या पैशाविरुध्द लढणे -** अर्थव्यवस्थेत काळ्या पैशाचे प्रमाण इतके वाढलेले आहे की, ते जेव्हा ५० टक्क्यांपर्यंत असते तेव्हा अर्थव्यवस्थेत एक समांतर अथव्यस्था (paraller economy) अस्तित्वात असते. या सर्वांमुळे चलनवाढ होऊन वस्तू व सेवांच्या किंमती वाढतात.

२) **बनावट चलननिर्मितीस आळा घालणे** - नकली नोटा अर्थव्यवस्थेत आल्यामुळे परकीय शक्तींना भारतात देशविघातक कार्यासाठी तो पैसा वापरता येतो. भारतातील बेकार असलेला तरुण बेरोजगारीपायी अशा वाईट प्रवृत्तीचा आधार होतो व देशद्रोही बनतो, बनावट नोटा देशविरोधी आणि विघातक कामांसाठी वापरून देशातल्याच लोकांना भडकविण्याचे काम दहशतवाद्यांकडून होत आहे.

३) **आतंकवाद विरुध्द लढणे -** एकीकडे दहशतवाद व नक्षलवाद यांच्या हल्ल्यातून रोज आपले जवान शहीद होत असताना त्यांच्यासाठी नोटबंदीचा निर्णय महत्वाचा आहे. काश्मीरमध्ये फुटीरवादी तरुण केवळ ५०००रु. घेऊन दिवसभर दगडफेक करतो. अशा तरुणांना होणारा पैशाचा पुरवठा हा नकली नोटा छापूनच केला जातो. अशा विघातक कारणासाठी दडवून ठेवलेला पैसा एका निर्णयाने मातीमोल झाला. भारतीय अर्थव्यवस्था खिळखिळी करण्याच्या उद्देशाने आय.एस.आय. ही संघटना अब्जावधी रुपयांच्या बनावट नोटा भारतात आणून आर्थिक व्यवहारात मिसळत असल्याचे निदर्शसनास आले असतांना नोटा विमुद्रीकरणाचा धडाकेबाज निर्णय घेण्याची गरज निर्माण झाली होती.

४) **रोकडरहित अर्थव्यवस्था -** शासनाचा विमुद्रीकरणामागील मुख्य उद्देश म्हणजे भारतीय अर्थव्यवस्था रोकडरहित अर्थव्यवस्था तयार करणे हा दिसून येत आहे. यात रोख व्यवहाराऐवजी डेबीड कार्ड, क्रेडिट कार्ड, नेट बँकिंग, ऑनलाईन व्यवहार, ई-बँकिंग, चेक्स इत्यादीद्वारे कॅशलेस व्यवहाराचा वापर वाढविणे.

५) **भ्रष्टाचाराविरुध्द लढणे -** भ्रष्टाचार हा दैनंदिन जीवनाचा एक अविभाज्य भाग बनला आहे. तर भ्रष्टाचार आणि अवैध व्यवहार यामुळे काळा पैसा तयार होतो आणि तो अवैध मार्गाने पांढरा करण्यात येतो. हा काळा पैसा केवळ बेहिशेबी असतो. असे नाही तर त्यातून अनेक गुन्हेगारी स्वरुपाचे व्यवहार होत असतात. हा बेहिशोबी पैसा मोठ्या नोटांमध्ये साठवून ठेवलेला असतो. यासाठी विमुद्रीकरण करणे आवश्यक होते.

६) **करचोरी रोखणे -** कर चुकवेगिरीपासून लोकांना रोखण्यासाठी किंवा कर भरण्यासाठी उपाय योजावेच लागतात. शेवटी कॅशलेस व्यवहाराने कर संकलन जास्त होते व करचुकवेगिरीला आळा बसतो.

७) **रोखता पध्दती रोखणे -** भारतात स्वत:जवळ रोख रक्कम ठेवण्याचेच प्रमाण जास्त आहे. त्यात मोठ्या चलनाच्या नोटा दडवून ठेवल्या जातात. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत चलनाचे प्रमाण कमी होते. यासाठी रोखता रोखण्यासाठी विमुद्रीकरण आवश्यक आहे.

८) **महागाई विरुध्द लढणे -** तस्करी मार्गाने भारतात येणाऱ्या बनावटी भारी किंमतीच्या चलनी नोटांमुळे देशातील एकूण नोटांच्या संख्येत अनियंत्रित वाढ झाली. त्यामुळे सुध्दा भाववाढीत भर पडली आहे. यावर रिझर्व्ह बँकेला आणि पर्यायाने सरकारला देशातल्या भाववाढीवर अपेक्षित नियंत्रण ठेवता येत नव्हते. त्यामुळे मोठ्या चलनाचे विमुद्रीकरण करण्यात येते.

क) भारतातील पैशाच्या विमुद्रीकरणाचे परिणाम
(Effect Demonetization of Money in India)

८ नोव्हेंबर २०१६ रोजी चलनाच्या विमुद्रीकरणाचा निर्णय शासनाने घेतला. वर्तमान परिस्थितीचा विचार केला तर अर्थव्यवस्था खिळखिळी झाली होती. काळ जसजसा लोटला जात आहे तसतसे वर्तमान परिणाम स्पष्टपणे दिसून येत आहेत. याचे नकारात्मक व सकारात्मक परीणाम पुढीलप्रमाणे ३

अ) नकारात्मक परीणाम

१) महसुली उत्पन्नात घट

विमुद्रीकरणापासून महसुली उत्पन्नात लगातार घट झाली असल्याची नोंद झाली आहे. जवळजवळ ८० टक्के महसुली उत्पन्न बुडाल्याचा दावा ॲक्टिंग. मॅन कॉम या वेबसाईडने केला आहे. महसुली उत्पन्नात घट झाल्याचा प्रमुख कारणांचा विचार केला तर पुरवठ्याशी संबंधीत कुठल्याही कारणामुळे महसुलात घट आढळून येत नाही. मागणीचे प्रमाण खरेदी शक्ती कमी झाल्याने महसुली उत्पन्नात घट झाल्याचे दिसून येते.

२) आवश्यक वस्तूंच्या किंमतीत घट -

अन्नधान्य, भाजीपाला, व अन्नपदार्थाच्या किंमतीमध्ये विमुद्रीकरणापासून लगातर घट होतांना दिसत असून २५ ते ५० टक्के किंमतीमध्ये घट झालेली दिसून येत आहे.

३) शेती उत्पादनाच्या किंमतीत व पुरवठ्यात घट -

विमुद्रीकरणाचा परिणाम अन्नधान्याबरोबर शेतीच्या इतर उत्पादनाच्या किंमतीवर दिसला आहे. निश्चलीकरणापासून कापूस, कांदा, केळी, टमाटे इ. सारख्या पिकांच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात घट झालेली असून त्याचा परिणाम म्हणून बाजारात येणाऱ्या पुरवठ्यावर देखील त्याचे विपरीत परिणाम होऊन पुरवठा कमी झाल्याचे आढळून आले आहे.

शेतकरी वर्गास रोजच्या कौटुंबिक गरजेव्यतिरिक्त दैनंदिन शेतीकामासाठी दररोज चलनाची गरज लागते. त्यामुहे नाही म्हटलं तरी, शेतकऱ्यांना आवश्यक असणाऱ्या बी- बियाणे, निविष्ठा खरेदीच्या दृष्टीने अडचणी येत असल्याचे निदर्शनास येत आहे. शेती उत्पादनात निविष्ठा खरेदीबरोबरच मजुरांना द्यावी लागणारी मजुरी देण्यामध्येही अडचणी येत असल्याचे शेतीच्या मशागतीची कामे करणे थोडे अवघड जात आहे. चलनात मुख्यत: रु. १०० च्या नोटांनाच मागणी राहिली कारण, त्याद्वारे मजुरी व निविष्ठा खरेदी करणे सोपे जाते चलनात रु. २००० च्या नोटांचा म्हणावा तसा वापर होऊ न शकल्याने अनेक अडचणींना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागले. त्याला कारणही तसेच आहे. रु. १०० नंतर रु. २००० ची नोटे मधील मोठा फरक असल्याने सुट्टे पैसे मिळणे मुश्कील झाले असून, त्यातच ४० टक्क्यांपेक्षा अधिक छोटे व मध्यम शेतकऱ्यांचे बहुतांशी व्यवहार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत आहेत. तसेच किंवा जुन्या रु. ५०० व रु. १००० च्या नोटा स्वीकारण्याचा अधिकार नसल्यामुळे शेतकऱ्यांना शेतकामासाठी चलन उपलब्ध होत नसल्याचे दिसते. एकीकडे उत्पादन घेण्यात अडचणी येत आहे. तर दुसरीकडे नाशवंत शेत उत्पादनाचे भाव घसरल्याने शेतकऱ्यांमध्ये काही प्रमाणात चिंताग्रस्त परिस्थिती निर्माण झाली.

कृषी उत्पन्न बाजार समिद्वारे बहुतांशी शेतीमालाची विक्री केली जाते. परंतु व्यापारी वर्गाकडे शेतकऱ्यांना द्यावयास चलन नसल्यामुळे व्यापारी शेतीमाल खरेदी करण्यास नकार देत असल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या भाजीपाल्यासारख्या शेतमालाची किरकोळ स्वरुपात विक्रि करावी लागत आहे. सहाजिकच चांगल्या पावसामुळे आलेले चांगले उत्पादन मिळत आहे. त्यामुळे किरकोळ विक्रिसाठी वाढलेली आवक याचा परिणाम भाजीपाल्याचे दर घसरण्यावर झाला. ९ नोव्हेंबर पूर्वी व नंतरच्या भाजीपाल्यांचे दराचे जर अवलोकन केले तर साधारणपणे ३० ते ५० टक्क्यांची किरकोळ विक्रिचे दर घसरल्याचे निदर्शनास येते. भाजीपाला नाशवंत त्यात बँकेकडून मर्यादित प्रमाणात मिळणारे चलन, व्यापाऱ्याकडून खरेदीस नकार अशा परिस्थितीत मिळेल त्या दरात शेतकरी आपला भाजीपाला विकून चलन उपलब्ध करत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

याचप्रमाणे दूध संस्थेकडूनसुध्दा चलन तुटवड्यामुळे दुधाचे पेमेंट मिळण्यात अडचणी येत आहेत. उत्पन्न मिळण्यात अडचण, परंतु खर्चामध्ये दुभत्या जनावरांसाठी वैरण, चारा खरेदी करावाच लागत असल्यामुळे शेतकऱ्यांना नेहमीपेक्षा जास्त अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

४) जनावरांच्या बाजारतही मंदी -

म्हैस, गाय, शेळी, बोकड, कोंबडे विक्रिला नेले तरी त्या ठिकाणी व्यापऱ्यांकडून चेक किंवा जुन्या नोटा दिल्या जात होत्या. अशा वेळी त्या व्यापाऱ्यांवर किती विश्वास ठेवायचा . अशा वेळी शेतकऱ्यांची गळचेपी झाली. बाजारातील उलाढाल थांबली. दूध उत्पादकांनीही दुधाचे पेमेंट बँकात वर्ग झाले. या बँका म्हणजे सहकारी बँका. सहकारी बँकांना व्यवहार करण्यावर बंदी त्यामुळे आजारी जनावरांची औषधी, डॉक्टरची फी, पशुखाद्यांचे पेमेंट, रोजच्या चाऱ्यांचे पैसे द्यायचे कसे हा सगळा यक्ष प्रश्न होता.

टोमॅटो पिकाचेही असेच वाटोळे झाले. पाक, अफगाण, नेपाळ, ब्रम्हदेशपर्यंत जाणारे टोमॅटो पठाणकोट हल्यानंतर सगळ्या सीमा बंद झाल्या. ३०० रु. कॅरेट प्रमाणे जाणाऱ्या टमाट्याचा दर ५० ते १०० रु. कॅरेटपर्यंत कमी झाला. एकरी १ लाखापर्यंत खर्च करुन डोळ्यादेखत ते पीक सोडून द्यावे लागले. संसदेत शेतकऱ्यांच्या प्रश्नाला कोणीच वाचा फोडली नाही.

५) सावकाराकडून कर्ज -

केंद्र सरकारने नोटाबंदी केल्यानंतर शेतकऱ्यांची सर्वात मोठी परवड झाली. शेती उत्पादन बरे झाले. पण शेतमाल मातीमोल किंमतीत विकला गेला. नोटबंदीमुळे रब्बीची पेरणी वाढली म्हणून सरकार पाठ थोपटून घेत आहे. परंतु त्यासाठी शेतकऱ्यांना १३ हजार ५५ कोटी रु. कर्जाची गरज होती. पण बँकानी २४०० कोटी दिले. जिल्हा सरकारी बँकांची सरकारनेच अडचण केली. त्यामुळे शेतकऱ्यांनी वार्षिक २४ टक्के ते १२० टक्के व्याजदराने सावकारकडून कर्ज घेतल्याचे एका पाहणीतून पुढे आले आहे. सावकार नियंत्रण कायदा निष्प्रभ ठरत आहे. हेही या निमित्ताने स्पष्ट झाले.

६) मध्यम वर्गावरील परिणाम -

सरकारने पारदर्शकता वाढविणच्या प्रयत्नात उद्योगावरील करांचे ओझेही वाढविले आहे. परिणामी उद्योगांचा नफा दोघं बाजून म्हणजे किंमती कमी झाल्याने व कर वाढल्याने नफा कमी होत आहे. परिणामी उद्योजक वेतन कपातीचे धोरण वापरत असून बेरोजगारीमुळे मध्यम वर्गावर भयानक परिणाम झालेला दिसत आहे.

तसेच दुसऱ्या बाजूचा विचार केला तर शासनाने नोकर वर्गाच्या वेतनातून कर कपातीचे धोरण अवलंबिले. याचा परिणाम मध्यम वर्गाच्या खरेदी शक्तींवर होतांना दिसून येत असून यातून गरिबीचे प्रमाण वाढेल यात शंका नाही.

७) घर खरेदी करण्याऱ्यांची संख्या कमी -

विमुद्रीकरणानंतर घर खरेदीतील संख्या ५० टक्के घटली.

भारतीय अर्थव्यवस्थेवर जसे अल्पकाळात विमुद्रीकरणाचे नकारात्मक परिणाम झालेले दिसतात. तसेच दिर्घकालीन सकारात्मक परिणामही दिसतात.

ब) चांगले / सकारात्मक परिणाम

१) महसुली उपलब्धतेत वाढ

सरकारला विविध योजनांच्या कार्यान्वयासाठी महसुली उत्पन्नाची आवश्यकता असते. सरकारी उत्पन्नापेक्षा सरकारी खर्च जास्त आहे. यातून मार्ग काढण्यासाठी कर्जाचा वापर केला जातो. परंतु याचा बोझा दीर्घकाळात मारक ठरतो. सरकारच्या काळ्या पैशाविरुध्दच्या २०१५ पासूनच्या कार्यवाहीमुळे १.२५ लाख कोटीपेक्षा जास्त काळा पैशाचा खुलासा झालेला आहे. परिणामी महसुली उपलब्धतेत वाढ झालेली असून विमुद्रीकरणामुळे त्यात अजून भरीव वाढ झालेली आहे.

२) बिनरोखीच्या व्यवहारात वाढ-

रोख पैशाची कमतरता निर्माण झाल्याने कॅशलेस व्यवहारांना वाव मिळालेला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या सुपरिणामांमध्ये हा सर्वांत चांगला परिणाम अर्थव्यवस्थेवर दिसत असून व्यवहारातील पारदर्शकता वाढल्याने सरकारी उत्पन्नात भरीव वाढ झालेली दिसून येत असून विक्रि करापासून मिळणाऱ्या महसुलात मोठी वाढ झाली आहे.

रुपे या कार्डाचा वापर, यंत्र आधारित कार्डाचा वापर तसेच कॅशलेस च्या निमित्ताने बँकांकडे असलेलेली रोखता, त्यांची रोखता कार्यक्षमता वाढून बँका अधिकाधिक उत्पादक कर्ज देण्यास तयार होतील. यातून बेरोजगार तरूण व शेतकरी यांना मोठ्या प्रमाणात कर्जपुरवठा होईल अशा लोकांचे उत्पन्न वाढेल याचे वर्तमान नकारात्मक परिणाम दिसून आले असून दिर्घकाळात सकारात्मक दिसून येतात.

३) कर चोरीस आळा - विमुद्रीकरणामुळे करचोरी, कर लपविलेला पैसा शासना समक्ष सादर करावा लागल्यामुळे चुकविलेला कर तर भरावा लागला परंतु पेनल्टी चार्जदेखील द्यावे लागले. कॅशलेस व्यवहारांना चालना मिळाल्याने भविष्यात कर चोरीमुळे काळा पैसा निर्माण होणाच्या प्रमाणास आळा बसला आहे.

४) गृह व गृह कर्ज स्वस्त होण्याचे संकेत -

विमुद्रीकणामुळे रिअल इस्टेटमधून काळ्या पैशाची पूर्णता सफाई होत आहे. त्यामुळे अशी अशा निर्माण झाली आहे की, जे प्रमाणीक पैसे कमविणारे गरीब आहे. ते आपल्या घराचे स्वप्न पूर्ण करु शकतील. विमुद्रीकरणामुळे वर्तमान परिस्थितीत मोठ्या घरांची विक्री पूर्णपणे थांबलेली आहे. कारण मोठी घरे जास्त करुन काळ्या पैशाच्या आधारावर खरेदी केली जात होती. अशा परिस्थीतीत लोक लहान घरे खरेदी करण्याकडे वळलेले दिसत आहेत. फेडरेशन ऑफ रियल इस्टेट डेव्हलपर्स असोसिएशन ऑफ इंडियाच्या नुसार येणाऱ्या काही महिन्यात लहान घर खरेदीत तेजी येऊ शकते. कारण मंदीरातून बाहेर पडण्यासाठी बिल्डर छोट्या घरांच्या किंमतीत घट करु शकतात.

५) गरीब श्रीमंतातील दरी कमी होण्याचे संकेत -

सरकारच्या अतिशय महत्वाच्या कार्यास विमुद्रीकरणामुळे वाव मिळाला आहे. विमुद्रीकरणामुळे काळा पैसा तर बाहेर आलाच सोबत कॅशलेस व्यवहारात वाढ झाल्याने करापासून मिळणाऱ्या उत्पन्नात भरीव वाढ होत आहे. परिणामी सरकार श्रीमंतांकडील उत्पन्न काढण्यास समर्थ ठरत असून ते गरिबांसाठीच्या विविध योजनांवर खर्च करीत आहे. परिणामी गरीब व श्रीमंतातील दरी वर्तमान व भविष्यात देखील कमी होईल असे स्पष्ट संकेत दिसत आहेत.

६) शेतकऱ्याची फसवणूक कमी -

चलन तुटवड्याची परिस्थीती सुधारल्यांनंतर या अडचणी निश्चितपणे दूर होतील. आज शेतकऱ्यांना ग्राहकांच्या किंमतीतील ५०-६० टक्केच हिस्सा मिळतो आहे. शिवाय बऱ्याच प्रमाणात फसवणुकीचे प्रकार होताना दिसतात. परंतु सर्व व्यवहार जर ऑनलाईन झाले तर निश्चितपणे सर्व बाबींचे रेकॉर्ड राहील, त्यातूनच ऑनलाईन मार्केटिंग, डायरेक्ट मार्केटिंग संकल्पना रुजण्यास मदत होईल. शेतकरी जास्तीत जास्त ऑनलाईन संकल्पनेचा वापर तसेच दराबाबतची विविध मोर्केटमधील माहिती ऑनलाईन घेऊ लागल्यावर ग्राहकाच्या किंमतीतील उत्पादकाचा हिस्सा वाढण्यास मदत होईल. शिवाय उत्पादक शेतकऱ्याच्या फसवणुकीस आळा बसेल. त्यामुळे शेतकऱ्यांनीही ऑनलाईनासारखे तंत्रज्ञान आत्मसात करुन जास्तीत जास्त फायदा मिळविणे गरजेचे आहे. निश्चितपणे सध्या येत असलेल्या अडचणी तात्पुरत्या स्वरुपाच्या आहे. त्यासाठी लवकरात लवकर व जास्तीत जास्त चलन व्यवहारात उपलब्ध होणे आवश्यक आहे. भविष्यात शेतकऱ्यांना या निर्णयाचा निश्चितपणे फायदा होईल.

८) जी.डी.पी. मध्ये वाढ -

विमुद्रीकरणामुळे भारतातील भाववाढीचा दरावर व जी.डी.पी. वर जास्तीत जास्त परिणाम होईल. भविष्यात ७.६ टक्के जी.डी.पी. दर राहिल असे भाकीत करण्यात आले. काळ्या पैशाच्या व्यवहाराला कमी संधी राहिल. तळागाळातील लोकांना तांत्रिक ज्ञान नसते. त्यामुळे या व्यवहारात अनेक अडचणी येतील. परंतु दिर्घकालीन विचार केला तर सकारात्मक परिणाम दिसून येईल.

सध्या देशात १५,००० लोकसंख्येमागे एक राष्ट्रीयकृत बँक असे समीकरण आहे. वास्तविक २००० लोकसंख्येमागे एक बँक शाखा असावयास पाहिजे थोडक्यात एखादी समस्या समूळ नष्ट करायची असेल तर त्यावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना किंवा नियोजन याची सर्वप्रथम व्यवस्था करणे गरजेचे आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार करतांना सर्वात जास्त चलन २००० रु. चे आहे. तसेच आजही शासनाच्या निश्चलीकरणे विमुद्रीकरण व कॅशलेस व्यवस्थेवर अनेकांनी आपली मते मांडली. परंतु कॅशलेस परिघाबाहेरच असल्याचे चित्र दिसून येते. कारण देशात मूलभूत सुविधांचा अभाव आहे.

निष्कर्ष -

विमुद्रीकरणामुळे वर्तमान परिस्थितीत अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम झालेला आहे. परंतु पुढील काळात सरकारच्या कार्याची वर्तमान परिणामकता वाढल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेस दिर्घकाळात चालना मिळेल, असे संकेत स्पष्टपणे दिसत आहे. त्यामुळे सरकारच्या निर्णयाच्या बाबतीत तिळमात्र शंका न बाळगता काही काळ जाऊ द्यावा लागेल व नंतर त्याचे चांगले परिणाम पाहावयास मिळतील.

संदर्भ -

१) व्हिजन रिसर्च - कॉमर्स, मॅनेजमेंट ॲण्ड सोशल सायन्स.
२) Dishti Current Affairs Today, January २०१७.
३) सकाळ साप्ताहिक-मासिक, नोव्हेंबर-डिसेंबर २०१६.
४) www.actingman.com
५) लोकप्रभा - मासिक, नोव्हेंबर-डिसेंबर २०१६.
६) लोकसत्ता - वर्तमानपत्र, १५-१८ नोव्हेंबर, २०१६.
७) कुक्षेत्र - मासिक, डिसेंबर २०१६, माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार.